क्र. मुंमप्रविप्रा/बैठक/८७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे [पूर्व],
मुंबई - ४०० ०५१

दिनांक : १५ मे, १९९७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ४ एप्रिल, १९९७ रोजी झालेल्या ८७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
[ श्र. वि. आसगांवकर ]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं. म. प्र. वि. प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# ८७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ४ एप्रिल, १९९७ [ शुक्रवार ] |
| वेळ | : | मध्यान्ही १२.१५ वाजता |
| सभास्थान | : | मा. मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री. मनोहर जोशी<br>मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. चंद्रकांत खैरे<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री. राज पुरोहित<br>गृह निर्माण, कामगार व<br>सेवायोजन राज्यमंत्री | सदस्य |
| सरदार तारासिंह एस्. नंद्रजोग<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. चंद्रकांत पडवळ<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. वसंत डावखरे<br>विधान परिषद सदस्य | सदस्य |

श्री. दिनेश अफझलपूरकर — सदस्य
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

श्री. के. नलिनाक्षन — सदस्य
शासनाचे प्रधान सचिव
नगर विकास विभाग

श्री. जयंत देशपांडे — सदस्य
शासनाचे सचिव
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग

श्री. क. चं. श्रीवास्तव — सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

निमंत्रित :

श्री. नंदलाल
शासनाचे सचिव
नगर विकास विभाग

सरदार तारासिंह एस्. नंद्रजोग हे त्यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर प्रथमच प्राधिकरणाच्या बैठकीला उपस्थित राहिले होते. त्यांचे मा. अध्यक्षांनी पदसिध्द सदस्य म्हणून प्रारंभी मन:पूर्वक स्वागत केले तसेच बृहन्मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर, श्रीमती विशाखा राऊत ह्या प्राधिकरणाच्या पदसिध्द सदस्या झाल्या आहेत असेही मा. अध्यक्षांनी त्यानंतर सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी, प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री. विलास विष्णू सावंत यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करतांना श्री. सावंत हे राज्याचे माजी नगर विकास राज्यमंत्री या नात्याने दिनांक १५/३/१९८६ ते दिनांक २६/६/१९८८ या काळात प्राधिकरणाचे सदस्य होते असे सांगितले.

त्यानंतर प्राधिकरणाने श्री. विलास सावंत यांच्या निधनाबद्दल शोक ठराव एक मिनिट स्तब्ध उभे राहून संमत केला [ परिशिष्ट पहावे ].

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [ ८६ व्या ] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यवसाय केंद्रामध्ये अधिवेशन केंद्र-नि-हॉटेल विकसित करणे [ बाब क्र. ६ ] च्या संदर्भात मे. इंडियन हॉटेल्स कंपनी लि. यांच्याकडून राज्य सरकार, प्राधिकरण किंवा अखिल भारतीय स्तरावरील मोठे राजकीय पक्ष वगैरेंच्या परिषदां वगैरेसाठी अधिवेशन केंद्राचा एका वर्षात १५ दिवसांपर्यंतचा वापर विनाशुल्क करू द्यावा तसेच परिषदांसाठी किंवा परिषदांना उपस्थित राहाणा-या सदस्यांसाठी काही सवलती मिळवाव्यात अशी सूचना मागील बैठकीमध्ये करण्यात आली होती. त्या बाबतीत विचारणा केल्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या मा. अध्यक्षांचे विचार लक्षात घेऊन जरूर असलेल्या सर्व सवलती राज्य शासन किंवा त्यांचे नामनिर्देशित किंवा प्राधिकरण यासाठी मागितलेल्या आहेत व त्यावर सदर कंपनीचे उत्तर लवकरच अपेक्षित आहे. त्यावर थोडीशी चर्चा होऊन कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [८६ व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही.

विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आलेल्या अर्जांवर परिनिरीक्षण फी चालू करण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात बृहन्मुंबईचे महानगरपालिका आयुक्त व महानगर आयुक्त यांनी चर्चा करून अशी

की एकाच संस्थेने आकारुन त्याचे दोन्ही संस्थामध्ये कशा त-हेने वाटप करता येईल हे ठरवावे असा निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक २८ नोव्हेंबर, १९९६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतला होता. पण त्याप्रमाणे अजून पर्यंत बैठक न झाल्यामुळे हा विषय प्रलंबित आहे यावर मा. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली व कुठल्याही परिस्थितीत हा प्रश्न ताबडतोब निकालात काढावा असे आदेश पुन्हा दिले.

त्यानंतर, प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : दक्षिण मुंबईतील घाऊक कापड बाजाराच्या पुन:स्थापनेसाठी जमिनीचे वाटप करणे.

३.१. या विषयावरील चर्चेच्या वेळी खालील मुद्दे उपस्थित करण्यात आले :-

१] १९७८ साली घाऊक कापड बाजाराचे वांद्रे-कुर्ला संकुलात स्थलांतर करण्याचे प्राधिकरणाने प्रथम ठरविले व त्यासाठी जमीन राखून ठेवली. त्यानंतर, १९८३ सालामध्ये प्राधिकरणाने व्यापा-यांना त्यांना जरुरी असलेल्या जागेची मागणी नोंदण्यास सांगितले व त्यावेळी जमिनीचा दर परिबध्द क्षेत्राला सुमारे रु.५,०००/- [ रुपये पाच हजार ] प्रति चौरस मीटर असेल असे निर्देशित केले. त्यानंतर, १९८६ मध्ये दुस-या मागणी नोंदणीच्या वेळी जमिनीचा दर परिबध्द क्षेत्राला रु.६,०००/- [ रुपये सहा हजार ] प्रति चौरस मीटर असेल असे प्राधिकरणाने निर्देशित केले. प्राधिकरणाने मागितल्याप्रमाणे व्यापा-यांनी पैसेही भरले. अशा परिस्थितीत प्रस्तावित रु.२१,०३३/- [ रुपये एकवीस हजार तेहतीस ] परिबध्द क्षेत्राच्या प्रति चौरस मीटर हा जमिनीचा दर त्यांना आकारणे योग्य होणार नाही.

२] दक्षिण मुंबईतील गर्दी कमी करणे हा प्राधिकरणाचा उद्देश आहे. त्यामुळे पैसे किती मिळतात ही बाब महत्वाची नाही.

३] पूर्वी कापड बाजाराच्या स्थलांतरासाठी बरीच जागा राखून ठेवण्यात आली होती व आता ती कमी करण्यात आली आहे.

४] प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने कापड व्यापा-यांचे सध्या दक्षिण मुंबईत असलेल्या जागेवर पुन:स्थापनेची शक्यता व सुसाध्यता पूर्णपणे अजमावून पहावी, असे सूचविले होते. त्यामुळे वांद्रे-कुर्ला संकुलात घाऊक कापड व्यापा-यांना जागा देण्याच्या या प्रस्तावाचाही विचार कार्यकारी समितीने करावा.

५] घाऊक कापड बाजार जर स्थलांतरित केला तर व्यापा-यांनी खाली केलेल्या जागा दुस-या वापरासाठी घरमालक वापरु शकतात व त्यामुळे दक्षिण मुंबईतील गर्दी कमी करण्याचा उद्देश सफल होणार नाही.

३.२. आणखी चर्चेनंतर, प्राधिकरणाच्या या बैठकीमध्ये या विषयावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यकारी समितीने विचार करुन त्यांच्या शिफारसी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीसमोर सादर कराव्यात असे ठरले.

<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई महानगर प्रदेशातील व महाराष्ट्रातील [ मुंबई महानगर प्रदेशाबाहेरील ] नागरी मूलभूत सुविधांच्या विकासासाठी वित्तीय सहाय्य देणे.</u>

४.१. या विषयावरील चर्चेच्या वेळी खालील मुख्य मुद्दे उपस्थित करण्यात आले :-

१] महाराष्ट्रातील निरनिराळ्या शहरात नागरी सुविधा पुरविण्यासाठी अर्थसहाय्य करण्याच्या उद्देशाने "महाराष्ट्र नागरी मूलभूत सुविधा निधी" स्थापन करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक ३० मे, १९९६ रोजी झालेल्या ८३ व्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. या विश्वस्त निधीच्या प्रारंभीच्या रु.१५०/- कोटी भांडवलापैकी तसेच त्या निधीचे व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन

करावयाच्या मत्ता कंपनीच्या रू. १ कोटी भांडवलापैकी, ४९ टक्के अंशदान प्राधिकरण व महाराष्ट्र शासन यांचे असेल व ५१ टक्के अंशदान एचडीएफसी, आयसीआयसीआय व आयएल ॲण्ड एफएस या वित्तीय संस्थांचे असेल. तथापि नागरी सुविधा पुरविण्यासाठी प्रचंड प्रमाणात निधीची गरज भासणार आहे हे लक्षात घेऊन, महाराष्ट्रातील उर्वरीत नागरी मूलभूत सुविधांसाठी लागणारा जास्त निधी कर्ज व ठेव स्याने पुरविणे शक्य होण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमामध्ये योग्य त्या दुरूस्त्या सूचवाव्यात.

२] ठाणे महानगरपालिका क्षेत्रामधील पाणी पुरवठा सुधारण्याच्या दृष्टीने ठाणे महानगरपालिकेने काही प्रस्ताव तयार करून पाठविल्यास त्या प्रकल्पास प्राधिकरणाने वित्तीय सहाय्य द्यावे.

३] मुंबई महानगर प्रदेशातील अविकसित विभाग व आदिवासी विभाग यांच्या सुधारणेसाठी प्राधिकरणाने प्रस्ताव/प्रकल्प तयार करून त्याची अंमलबजावणी करावी.

४.२. यावर आणखी चर्चा केल्यानंतर प. ४. १. [१] मध्ये सुचविल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियामध्ये दुरूस्ती करण्याचा मसुदा प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सादर करावा असे प्राधिकरणाने ठरविले.

त्यानंतर अध्यक्षांच्या संमतीने खालील बाबीचा पटल बाब म्हणून प्राधिकरणाने विचार केला :-

<u>पटल बाब</u> : <u>प्राधिकरणाकडून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघास अल्प मुदत कर्ज रू. २०० कोटी देणेबाबत...</u>

या विषयावर विचार करतेवेळी श्री. आर. एम्. प्रेमकुमार, शासनाचे सचिव, सहकार आणि वस्त्रोद्योग विभाग हे आमंत्रणावरून उपस्थित होते.

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. : ७१७

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासकीय निर्णयानुसार रु. १०० कोटी [ रुपये शंभर कोटी फक्त ] इतकी रक्कम कर्ज/ठेव म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघास तातडीने आवश्यकता असल्यामुळे प्राधिकरण संमती देईल या सापेक्ष अदा केली आहे, त्यास प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजुरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाल्यानंतरच महासंघास उर्वरीत राहिलेली रक्कम रु. १०० कोटी [ रुपये शंभर कोटी फक्त ] देण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. "

वेळेअभावी बाब क्रमांक ५ ते १६ वर विचार करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

- - - - - - - -

परिशिष्ट ....

परिशिष्ट

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ८७ वी बैठक

दिनांक : ४ एप्रिल, १९९७

: ठराव :

"श्री. विलास विष्णू सावंत, माजी नगरविकास राज्यमंत्री यांचे दिनांक २७ मार्च, १९९७ रोजी दु:खद निधन झाले. दिवंगत सावंत हे दिनांक १५.३.१९८६ ते दिनांक २६.६.१९८८ या कालावधीत नगरविकास राज्यमंत्री या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री. सावंत यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण, त्यांच्या दु:खद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री. सावंत यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दु:खात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

--------